# बृहन्मुंबई महानगरपालिका

घनकचरा व्यवस्थापन खाते

**स. अभि./ ई /6881/घकव्य. दि.04.02.2026**

विषय:- 'ई'विभागात 'रमजान' सणानिमित दि.18.02.2026 ते दि.22.03.2026 पर्यत स्वयंसेवकांमार्फत साफसफाई करण्याकरिता अशासकिय संस्थांची प्रभागनिहाय नियुक्ती करण्याबाबत.

## स्वारस्य अभिव्यक्ती

'ई' विभाग घन कचरा व्यवस्थापन खात्यात स्वच्छतेबाबत साफसफाईच्या कामाकरिता रमजान ईद-२०२६ सणांनिमित्त साफसफाईचे कामे" करण्यासाठी ई विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात नोंदणीकृत असणा-या इच्छुक स्थानिक / ई विभागात मनपाच्या कामात कार्यरत असलेल्या नोंदणीकृत सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा, सहकारी संस्था, अशासकीय संस्था इ. संस्थेमार्फत स्वयंसेवकांचा पुरवठा करण्याकरिता संस्थेची निवड, पात्रता यादी तयार करुन सोडत पध्दतीने निवड करुन काम करण्यासाठी अर्ज मागवित आहे.

| अनु. क्र. | योजनेचे नाव | कामासाठी निवड करावयाच्या संस्था |
|---|---|---|
| १. | 'ई'विभागात 'रमजान ईद-२०२६' सणानिमित साफसफाई करण्याकरिता अशासकिय संस्थांची प्रभागनिहाय नियुक्ती | 07 |

अर्जाचा नमुना 'ई' विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) यांचेकडे रु. 726/- + 09 % राज्य सरकार + 09 % क्रेंद्र सरकार (एकुण रु. 857/-) रोख स्वरुपात किंवा राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी. **बृहन्मुंबई महानगपालिका (Municipal Corporation of Greater Mumbai)** या नावाने (ना-परतावा) नागरिक सुविधा केंद्र (C.F.C.) येथे जमा केल्यानंतर अर्ज दि. 05.02.2026 ते दि.10.02.2026 सकाळी.10.30 ते संध्याकाळी 04.00 (दुसरा व चौथा शनिवार वगळून) या वेळेत मिळु शकेल. पात्र संस्थांची यादी व सोडतीचा दिनांक 'ई' विभाग कार्यालय येथे सूचना फलकावर लावण्यात येईल. पात्र संस्थांच्या यादीमधुन सोडत पध्दतीने यशस्वी झालेल्या संस्थाना कामाचे वाटप योजनेच्या अटी व शर्तीनुसार करण्यात येईल. प्रत्येक कामासाठी स्वतंत्र अर्ज व स्वतंत्र रक्कम भरणे आवश्यक आहे.

इच्छूक संस्थांनी अधिक तपशिल, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी 'ई' घन कचरा व्यवस्थापन कार्यालयात संपर्क साधावा. संस्थंने 'ई' विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारिख दि.11.02.2026 दुपारी. 04.00 वाजेपर्यंत आहे. नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.

सही/-

**सहा. अभि. (घकव्य), ई विभाग**